## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

बँकेची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि. २० नोव्हेंबर, २०२० रोजी सकाळी १०.०० वाजता खालील विषयांकरिता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (VC) / अदर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स (OAVM) द्वारे होणार आहे. सदर सभा यंदाच्या कोविड-१९ च्या साथीच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या निर्देशांचे पालन करणेकरिता व केंद्रिय निबंधक, सहकारी संस्था, नवी दिल्ली ह्यांच्या दि. २५.०८.२०२० रोजीच्या परिपत्रकातील निर्देशांनुसार आयोजित करण्यात आली आहे. सदर सभा ऑनलाईन पद्धतीने होणार असल्याने सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षित नाही. त्यामुळे बँकेचे नोंदणीकृत कार्यालय, ''सहकारमूर्ती गोपीनाथ शिवराम पाटील भवन'', ३ रा मजला, पारसिक नगर, कळवा, ठाणे-४०० ६०५ हे सभास्थान मानण्यात येईल. तरी या सभेस ऑनलाईन उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील विषय

१) दि. २८ जुलै, २०१९ रोजी झालेल्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृतांत वाचून कायम करणे.

२) वार्षिक अहवाल विचारार्थ ठेवणे व त्यास मंजुरी देणे ज्यामध्ये संचालक मंडळ अहवाल, दि. ३१ मार्च, २०२० अखेरचा वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक यांचा समावेश आहे.

३) सन २०१८-१९ सालच्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाच्या दोषदुरुस्ती रिपोर्टला मान्यता देणे.

४) संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार दि. ३१ मार्च, २०२० अखेरच्या नफा वाटणीस मंजुरी देणे.

५) सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

६) बँकेच्या पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे.

७) रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकानुसार बँकेने नियुक्त केलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नियुक्तीस मान्यता देणे.

८) सन २०२०-२१ करिता वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचे सेवा शुल्क ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे. संचालक मंडळ मे. गोगटे ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटटस् यांची सन २०२०-२१ करिता वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नेमणूक करण्याची शिफारस करीत आहे.

९) सर्वसाधारण सभासद ऑनलाईन वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर राहिल्यास त्यांची रजा मंजूर करणे.

१०) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार

**मनोज वसंत गडकरी**

प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी

**दिनांक : १४/१०/२०२०**

**ठिकाण : पारसिक नगर, कळवा, ठाणे - ४०० ६०५.**

---

टिप : १) सभेसाठी निश्चित केलेल्या वेळेपासून अर्ध्या तासाच्या आत जर गणसंख्या पूर्ण झाली नाही तर सभा स्थगित केली जाईल व अशी स्थगित सभा त्याच दिवशी, सकाळी १० वाजून ३० मिनिटांनी घेतली जाईल. या स्थगित सभेस पोटनियम क्र.३०(iii) नुसार गणपूर्तीची व वेगळ्या सूचनेची आवश्यकता राहणार नाही. सभेच्या ठरलेल्या वेळेस, जेवढे सभासद, बँकेने या सभेसाठी पाठविलेल्या अधिकृत लिंकवर जाऊन सभेस उपस्थित राहतील, त्यांची उपस्थिती गणसंख्या मोजतांना, त्यावेळी ग्राह्य धरली जाईल. वार्षिक अहवाल बँकेचे संकेतस्थळ www.gpparsikbank.com वर उपलब्ध आहे. तसेच वार्षिक अहवाल आपल्या जवळच्या शाखेत दि.२६ ऑक्टोबर, २०२० पासून उपलब्ध असून सभासदांनी घेऊन जावा. काही अनपेक्षित परिस्थितीत उदा. तांत्रिक कारणांमुळे सदर वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज खंडीत झाल्यास, तांत्रिक त्रुटींचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर लगेचच सभेचे कामकाज पुढे सुरु केले जाईल, याची सभासदांनी कृपया नोंद घ्यावी. ज्या सभासदांना, सभेच्या विषयाबाबत प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि. १२.११.२०२० पर्यंत शाखेच्या कार्यालयीन वेळेत शाखेमध्ये लेखी स्वरुपात द्यावे अथवा 49agm@gpparsikbank.net या मेल आयडीवर दि. १२.११.२०२० पर्यंत सभासद क्रमांक व संपूर्ण नांव नमूद करुन पाठवावेत.

GP PARSIK SAHAKARI BANK LTD.
(Multi-State Scheduled Bank)
Kalwa, Thane - 400 605.
(Registration No. MSCS/CR/1213/2015 date 26/03/2015)

# Notice of Annual General Meeting

49th Annual General Meeting of the Bank is scheduled at 10.00 a.m. on **Friday, 20th November, 2020** through Video Conferencing (VC) / Other Audio Visual Means (OAVM) as permitted by Central Registrar of Co-Op. Societies, New Delhi vide Circular dated 25.08.2020 on account of COVID-19 pandemic to transact the following business. This meeting does not require physical presence at a common venue. The deemed venue for 49th Annual General Meeting shall be registered office of the Bank situated at "Sahakarmurti Gopinath Shivram Patil Bhavan", 3rd Floor, Parsik Nagar, Kalwa, Thane –400 605.

## Agenda

1) To read and confirm the minutes of 48th Annual General Meeting held on 28.07.2019.
2) To consider and approve the Annual Accounts which consist of the report of Board of Directors, the report of Statutory Auditors, Profit & Loss A/c. and Balance Sheet of the Bank as at 31st March, 2020.
3) To approve the Compliance Report of Statutory Audit for the year 2018-19.
4) To approve appropriation of Profit for the year ending 31st March, 2020 as recommended by the Board of Directors.
5) To approve the Annual Budget for the year 2020-21.
6) To approve Bye-Laws amendments as proposed.
7) To approve the appointment of Chief Executive Officer as per Circular of Reserve Bank of India.
8) To appoint Statutory Auditors for the year 2020-21 and to authorize the Board of Directors to fix their remuneration. The Board of Directors recommend M/s. Gogate & Co., Chartered Accountants as Statutory Auditors for the Year 2020-21.
9) To condone the absence of members in the online Annual General Meeting.
10) Any other business with the permission of the Chair.

By the order of the Board of Directors

**Manoj Vasant Gadkari**

Officiating Chief Executive Officer

**Date : 14/10/2020**
**Place : Parsik Nagar, Kalwa, Thane- 400 605.**

**Note :** If within half an hour from the time appointed for the meeting, the quorum is not present, the meeting shall stand adjourned and this adjourned meeting shall be held at 10.30 a.m. on the same day as per Bye-Law No. 30(iii). This adjourned meeting will not require any separate notice or quorum. The counting of the quorum will be done on the basis of number of members logged in at the scheduled time of the meeting through the official link so provided by the Bank for this Annual General Meeting. Soft copy of the Annual Report is available on website of the Bank **www.gpparsikbank.com** The copy of annual report will be available from 26.10.2020 and members can collect the same from the nearest branch. Members are requested that if the said AGM is interrupted due to any unforeseen circumstances viz. technical fallout / network failure, etc. then the meeting will be continued immediately as soon as the system restored, on the same web link / platform. Members desirous of raising questions in respect of the agenda items may submit the same in writing at the branch during office hours up to 12.11.2020 or can send e-mail up to 12.11.2020 at **49agm@gpparsikbank.net** mentioning their member number and name.